# महाराष्ट्र शासन

जिल्हा परिषद, नंदुरबार - जाहिरात क्रमांक ०४/२०१४

## राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान,

## जिल्हा स्तर / ग्रामपंचायत स्तरावरील कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांची जाहिरात

**(शासन निर्णय क्र.रागापं-२०१८३/प्र.क्र.१४०/योजना-४ दि.६/८/२०१४)**

राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व कंत्राटी पध्दतीने जिल्हा स्तरावरील खालील पदांची भरती करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. भविष्यात या पदांवर शासनामध्ये कायम करण्यांचा हक्क सांगता येणार नाही. या अटीवरच उमेदवाराने अर्ज भरावा. पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा / ग्रामपंचायत स्तरावरील मंजुर पदे | संख्या | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | लिपिक | १ | नमूद शैक्षणिक अर्हता, लागणारा अनुभव, आर्थिक मोबदला, अटी व शर्ती कामाचे स्वरुप, निवड प्रक्रिया, अर्जाचा नमुना इ. बाबतचा सविस्तर तपशिल ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.रागांपं-२०१४/प्र.क्रं.१४८/योजना-४ मुंबई दि.१/८/२०१४ व शा.नि. क्रं.रागांपं-२०१३/प्र.क्रं.१४०/योजना-४ मुंबई दि.०६/०८/२०१४ मध्ये तसेच www.maharashtra.gov.in , http://rdd.maharashtra.gov.in व www.nandurbar.nic.in देण्यांत आलेला आहे. |
| २ | लेखापाल | १ | |
| ३ | कार्यालयीन सहाय्यक | १ | |
| ४ | परिचर | १ | |
| ५ | गट अभियंता | ६ | |
| ६ | पंचायत अभियंता (ग्रापं स्तर) | ६५ | |
| ७ | जिल्हा पेसा समन्वयक | १ | |
| ८ | तालुका पेसा समन्वयक | ६ | |
| | एकुण जिल्हास्तर पदे | ८२ | |

जिल्हा स्तरावरील पदांसाठी अर्ज करण्याचा पत्ता व संपर्कासाठी माहिती

**प्रति :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार**

**पत्ता :-** जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत, टोकरतलाव रोड, नंदुरबार -४२५४१२

**दुरध्वनी क्रमांक :-** (०२५६४) २१०२२४

**ई.मेल :-** dyceogadnbr@gmail.com

---

**जिल्हास्तरावरील कंत्राटी पदांसाठी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक २५ ऑगस्ट २०१४ .**

---

१) अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांकाच्या कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा, अपुर्ण स्वरुपातील माहिती भरलेल्या, ई-मेल द्वारे पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी www.maharashtra.gov.in , http://rdd.maharashtra.gov.in व www.nandurbar.nic.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. जाहिराती मधील सुचना व माहितीचा काळजीपुर्वक अभ्यास करुन विहित नमुन्यात पोस्टाने किंवा प्रत्यक्ष विहित दिनांकापूर्वी आणि विहित नमुन्यातील अर्ज सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार येथे द्यावा, इतरत्र दिलेला अर्ज स्विकारला जाणार नाही.

२) कंत्राटी पद भरती प्रक्रियेत कोणताही आणि केव्हाही बदल करण्याचा, पद संख्येत बदल करण्याचा अथवा भरती प्रक्रिया रद्द करण्याचा संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार तथा अध्यक्ष, जिल्हास्तर निवड समिती, नंदुरबार यांना राहतील.

३) वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या शासन निर्णयाचे अधिन राहुन, आरक्षणा नुसार पदांची संख्या कमी-जास्त होण्याची शक्यता आहे. तसेच शासन स्तरावरुन लोकसंख्यानुसार ग्रामपंचायती बाबत आदेश प्राप्त झाल्यास त्यानुसार आरक्षणाच्या पदांची संख्या कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.

४) पदांची संख्या कमी झाल्यास Merit List मध्ये सगळयात शेवटी असलेले उमेदवार आरक्षणाच्या बिन्दु प्रमाणे कमी केले जातील.

५) जाहिरातीमध्ये नमुद लिपीक, लेखापाल, कार्यालयीन सहाय्यक, परिचर, गट अभियंता, पंचायत अभियंता (ग्रापं स्तर), जिल्हा पेसा समन्वयक, तालुका पेसा समन्वयक पदा करीता खालील प्रमाणे आरक्षण लागु राहिल.

६) उपरोक्त पदांकरीता शासन निर्णयात नमूद प्रमाणे लेखी परिक्षा, तांत्रिक /कौशल्य चाचणी तसेच मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमानुसार उमेदवाराची निवड केली जाईल.

७) उमेदवार सध्या किंवा पुर्वी कंत्राटी तत्वावर एखाद्या शासकिय विभागांत कार्यरत असल्यांस त्यांना काढुन टाकले असल्यांस किंवा कार्यमुक्त केले असल्यांस त्या संबधीचा तपशील व अनुभवाचा तपशील स्वतंत्रपणे नमुद करणे आवश्यक आहे.

८) सदर पदासाठी परिक्षा शुल्क खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२००/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १००/- राहील. (माजी सैनिक उमेदवारांना परिक्षा शुल्क माफ आहे.) सदर परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया,नंदुरबार शाखेतील मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे नावे असलेले खाते क्रमांक ३२९२९३२८७४६ मध्ये ( IFS Code No. SBIN०००४३५, MICR No- ४२५००२८११ ) (कोअर बँकिंगद्वारा) भरणा करावा. सदर शुल्क नापरतावा राहील. अर्जासोबत शुल्क भरल्याबाबत मुळ पावती (Countre Slip) जोडून त्यावर उमेदवाराचे संपुर्ण नाव,प्रवर्ग व पदाचे नाव स्पष्टपणे नमुद करावे.

| अ. क्र | पदाचे नांव | आरक्षणाचे स्वरुप | | | | | | | | | | | | | भरावयाची एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आरक्षण प्रकार | अ. जा. | अ. ज. | वि. जा. अ. | भ. ज. ब. | भ. ज. क. | भ. ज. ड. | वि. मा. प्र. | इ. मा. व. | इ. एस. बी. सी. (शै. सा. मा.प्र.) | एस. बी. सी. ए. (वि.मा. प्र.-अ) | खुला | एकुण | |
| १ | लिपिक | समांतर आरक्षण विरहित पदे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | १ |
| २ | लेखापाल | समांतर आरक्षण विरहित पदे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | १ |
| ३ | कार्यालयीन सहाय्यक | समांतर आरक्षण विरहित पदे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | १ |
| ४ | परिचर | समांतर आरक्षण विरहित पदे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | १ |
| ५ | गट अभियंता | समांतर आरक्षण विरहित पदे | - | १ | १ | | | | - | १ | १ | - | २ | ६ | ६ |
| ६ | पंचायत अभियंता (ग्रापं स्तर) | महिला आरक्षण | २ | ४ | १ | १ | १ | - | - | २ | ३ | १ | ६ | २१ | ६५ |
| | | समांतर आरक्षण विरहित पदे | ३ | १० | १ | १ | १ | १ | १ | ४ | ७ | २ | १३ | ४४ | |
| ७ | जिल्हा पेसा समन्वयक | समांतर आरक्षण विरहित पदे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | १ |
| ८ | तालुका पेसा समन्वयक | समांतर आरक्षण विरहित पदे | - | १ | १ | | | | - | १ | १ | - | २ | ६ | ६ |

ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.रागांपं-२०१४/प्र.क्रं.१४८/योजना-४ मुंबई दि.१/८/२०१४ व शा.नि. क्रं.रागांपं-२०१३/प्र.क्रं.१४०/योजना-४ मुंबई दि.०६/०८/२०१४ नुसार मासिक वेतन खालील प्रमाणे राहिल-

| अ.क्र. | पदाचे नांव | कमाल मासिक वेतन (रुपये) |
|---|---|---|
| १ | लिपिक | रु.१५,०००/- |
| २ | लेखापाल | रु.२०,०००/- |
| ३ | कार्यालयीन सहाय्यक | रु.१२,०००/- |
| ४ | परिचर | रु.८,०००/- |
| ५ | गट अभियंता | रु.१८,०००/- |
| ६ | पंचायत अभियंता (ग्रापं स्तर) | रु.१६,०००/- |
| ७ | जिल्हा पेसा समन्वयक | रु.२५,०००/- |
| ८ | तालुका पेसा समन्वयक | रु.२०,०००/- |

स्वाक्षरीत/-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नंदुरबार

राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान-
गट व पंचायत अभियंता यांची नेमणूक करणे.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रागांपं-२०१४/प्र.क्र.१४८/योजना-४**
**बांधकाम भवन, २५ - मर्झबान पथ,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**
**तारीख: १ ऑगस्ट, २०१४.**

वाचा -

1) **शासन निर्णय क्रमांकः रागांपं-२०१२/प्र.क्र.९२/योजना-४, दिनांक ३.३.२०१४**
2) **शासन निर्णय क्रमांकः तेविआ-२०१०/प्र.क्र.७३/वित्त-४, दिनांक ८.१२.२०१०**

प्रस्तावना -

राजीव गांधी सशक्तीकरण अभियानाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय दि.३ मार्च,२०१४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला असून त्यामध्ये पंचायतीचे बळकटीकरण करण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेतील अधिकारी/ कर्मचारी यंत्रणा आणि पदाधिकारी व सदस्यांचे सक्षमीकरण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. या अभियाना अंतर्गत पंचायत राज संस्थेतील पायाभूत सुविधा उपलब्ध करुन पंचायत राज व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर अभियानांतर्गत पंचायत राज संस्थांना आपली कार्ये व जबाबदाऱ्या वेळेवर, कार्यक्षमतेने आणि अचूकपणे पार पाडण्यासाठी तांत्रिक व प्रशासकीय मनुष्यबळाचे पाठबळ उपलब्ध करुन देण्याचे प्रावधान करण्यात आले आहे. मोठ्या ग्रामपंचायतींना तांत्रिक मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे नियोजित विकास अपेक्षित वेगाने साध्य होत नाही, अशा मोठ्या ग्रामपंचायतींना तांत्रिक मनुष्यबळाची आज नितांत आवश्यकता आहे. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत पंचायतस्तरावर मनुष्यबळ निर्मिती करण्यासाठी ५००० च्या

पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठया ग्राम पंचायतींना करारतत्वावर पंचायत विकास अधिकारी नेमण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि अशा पंचायत विकास अधिकाऱ्यांचे प्रशासकीय मनुष्यबळ निर्माण करण्याऐवजी पंचायतींना तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता महत्वाची असल्याने या योजने अंतर्गत ग्राम पंचायत स्तरावर तांत्रिक मनुष्यबळ निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय-</u>**

१. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षम होण्यासाठी ग्राम पंचायतस्तरावर मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. ग्राम पंचायतींची निकड लक्षात घेता, स्थानिक विकासाचे केंद्र म्हणून ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठया ग्रामपंचायती विकसित करण्यासाठी व त्यांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी निव्वळ करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात ग्रामपंचायत स्तरावर पंचायत विकास अधिकारी ऐवजी एक पंचायत अभियंता प्रति ग्रामपंचायत आणि एक गट अभियंता प्रति पंचायत समिती पद भरण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. पंचायत अभियंत्यांची नेमणूक :- राज्यातील ग्रामपंचायतींना त्यांचे तांत्रिक कामकाज प्रभावीपणे पार पाडण्यासाठी पंचायत अभियंत्यांची नेमणूक करुन त्यांना तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येत आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीसाठी २०११ च्या लोकसंख्येनुसार ज्या ग्राम पंचायतींची लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त आहे, अशा ग्राम पंचायतींना एक पंचायत अभियंता नेमण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे. पंचायत अभियंता या पदांचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे :-

| पदाचे नाव | पंचायत अभियंता |
|---|---|
| पद संख्या | २०७५<br>(५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीस १ याप्रमाणे) |
| ठोक वेतन | रु.१६०००/- (या रकमेत प्रवास खर्च व इतर सर्व प्रकारचे भत्ते अंतर्भूत असून याशिवाय इतर कोणतीही रक्कम अनुज्ञेय नाही.) |
| शैक्षणिक अर्हता | स्थापत्य अभियंत्रिकी पदवीधारक BE/BTech(Civil)<br>(पदवीधारक न मिळाल्यास एक वर्षाचा अनुभव असलेला पदवीकाधारक - D.C.E (Civil) घेण्यात यावा) |
| नियुक्तीचा प्रकार | कंत्राटी (निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची) |

३. राज्यात २०११ च्या जनगणनेप्रमाणे ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या २०७५ आहे. त्यामुळे पंचायत अभियंत्यांची एकूण २०७५ पदे निर्माण करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. तथापि **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २०११ च्या जनगणनेप्रमाणे अशा ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त असल्याची खात्री करून आपल्या जिल्हयातील ग्राम पंचायतींची संख्या आणि पंचायत अभियंत्याची संख्या निश्चित करावी** आणि तेवढयाच ग्राम पंचायतींसाठी पंचायत अभियंत्यांची नेमणूक करावी. (सुलभ संदर्भासाठी संभाव्य ग्राम पंचायतींची यादी सोबत जोडण्यात येत आहे **परिशिष्ट-१**) सोबत जोडलेल्या यादीत सर्वच ग्रामपंचायतीसाठी पदे न भरता जनगणना २०११ च्या लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतीची संख्या निश्चित झाल्यानंतर फक्त निकषात बसणाऱ्या ग्रामपंचायतीच्या संख्येएवढीच पदे भरण्यात यावीत. तसेच सोबतच्या यादीत नसलेल्या ग्रामपंचायती जर निकषात बसत असतील त्या ग्रामपंचायतींची पदे शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय भरण्यात येऊ नयेत. कोणत्याही परिस्थितीत यादीत दिलेल्या ग्रामपंचायतींपेक्षा जास्त पदे भरली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

**पंचायत अभियंत्यांची कामे व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील:-**

१) ग्राम पंचायतीने करावयाच्या स्वनिधी/ केंद्र/ राज्य पुरस्कृत योजनांच्या कामांसाठी विहीत विविध नियमावलीनुसार तपासून तांत्रिक सल्ला देणे व त्यानुसार त्या कामाची अंदाजपत्रके तयार करणे, त्याबाबत संबंधित प्राधिकाऱ्यांची मान्यता घेणे इत्यादी.

२) मान्यता प्राप्त कामाबाबत निविदा प्रक्रिया राबविणे व कार्यारंभ आदेश दिल्यानंतर प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेनुसार काम पूर्ण होईपर्यंत देखरेख करणे, कामाच्या मुल्यांकनासह पूर्णत्वाचा दाखला देणे इ.

३) ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलम ५२/५३ खाली प्राप्त झालेले बांधकामाबाबत प्रस्तावाचे विहीत नियमावलीनुसार छाननी करणे व आपल्या तांत्रिक अभिप्रायाद्वारे विहीत नियमावलीस अनुसरुन बांधकाम परवानगी देण्यास्तव ग्राम पंचायतीला सहाय्य करणे.

४) पंचायतीमार्फत करण्यात येणाऱ्या कामांचे मूल्यमापन करणे व सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेणे.

५) ग्रामपंचायतींच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेणे. ग्रामपंचायतींचे बांधकाम किंवा इतर तत्सम कामांवर तांत्रिक देखरेख ठेवणे.

६) खाजगी इमारतींच्या बांधकामांना परवानगी देण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच / सचिव यांनी पंचायत अभियंत्यांकडे पाठविल्यानंतर विकास आराखडयाची नियमावलीनुसार तांत्रिक तपासणी करुन ते बरोबर असल्याची खात्री करावी.

७) बांधकाम परवानगीपूर्वी पंचाय़त अभियंत्याचा सल्ला न घेता किंवा दिलेल्या सल्ल्याच्या विरुध्द ग्रामपंचायतीने बांधकाम परवानगी दिल्यास अशी प्रकरणे माहितीसाठी गट विकास अधिकाऱ्यांकडे/ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे कळविण्याची जबाबदारी पंचायत अभियंत्याची राहील.

८) पंचायत अभियंता गट विकास अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली असतील. तथापि ते ग्रामपंचायतीस जबाबदार राहतील.

९) ग्राम पंचायत/ ग्राम सेवक, गट विकास अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयातील वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार कामे/ जबाबदाऱ्या पार पाडणे.

५. गट अभियंतांची नेमणूक:- पंचायत स्तरावर मनुष्यबळ निर्मितीसाठी दिनांक ३.३.२०१४ च्या शासन निर्णयातील परि. १.२ अन्वये ३५१ पंचायत समितींच्या पातळीवर प्रत्येकी २ कनिष्ठ

अभियंत्यांची नेमणूक करण्यासाठी ७०२ कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांच्या पदांना मान्यता देण्यात आली होती. त्याचा तपशिल परि.४.४ मध्ये देण्यात आलेला आहे. यात बदल करुन आता राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान वार्षिक कृती आराखडा सन २०१४-१५ मध्ये ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी आहे अशा ग्रामपंचायतींना कामाच्या संदर्भात तांत्रिक सहाय्य करण्यासाठी पंचायत समिती पातळीवर २ ऐवजी १ गट अभियंत्याची नेमणूक करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे एकूण ७०२ पदांऐवजी फक्त ३५१ गट अभियंत्यांची करार तत्वावर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**६. गट अभियंत्याच्या पदाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-**

| | |
|---|---|
| पदाचे नाव | पंचायत अभियंता |
| पद संख्या | ३५१ (५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीस) |
| ठोक वेतन | रु.१८०००/- (या रकमेत प्रवास खर्च व इतर सर्व प्रकारचे भत्ते अंतर्भूत असून याशिवाय इतर कोणतीही रक्कम अनुज्ञेय नाही.) |
| शैक्षणिक अर्हता | स्थापत्य अभियंत्रिकी पदवीधारक BE/BTech(Civil) (पदवीधारक न मिळाल्यास दोन वर्षाचा अनुभव असलेला पदवीकाधारक - D.C.E (Civil) घेण्यात यावा) |
| नियुक्तीचा प्रकार | कंत्राटी (निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची) |

**७. गट अभियंता यांची कामे व जबाबदाऱ्या :-**

१) गट विकास अधिकारी/ सहाय्यक गट विकास अधिकारी यांच्या आदेशानुसार ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायत/ पंचायत समिती/ जिल्हा परिषद मार्फत स्वनिधी/ केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतील कामांबाबत तांत्रिक सहाय्य करणे.

२) बांधकामांसाठी व इतर प्रस्तावांची तांत्रिक छाननी करणे, कामांची अंदाजपत्रके, निविदा प्रक्रिया करणे, वेळप्रसंगी कामांवर देखरेख करणे, मोजमाप व मुल्यांकन करणे, इ. जबाबदाऱ्या पार पाडणे.

३) ग्राम पंचायतीतील पंचायत अभियंत्याच्या कामांचा आढावा, पाठपुरावा इ.कामे करणे तसेच गट विकास अधिकारी/सहाय्यक गट विकास अधिकारी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पंचायत समितीच्या कामाबाबतीत जबाबदाऱ्या पार पाडणे.

८. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान अंतर्गत पंचायत / गट अभियंत्याची नेमणूक करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. ज्या ग्रामपंचायती लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त असेल अशा ग्रामपंचायतीला एक पंचायत अभियंता अशी नेमणूक करण्यात यावी. पंचायत अभियंत्याची नेमणूक करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी २०११ च्या जनगणनेप्रमाणे पंचायत अभियंत्यांच्या भरतीची संख्या निश्चित करतील. संबंधित जिल्ह्याच्या एकूण पंचायत अभियंत्याच्या संख्येच्या दिडपट प्रतिक्षा यादी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तयार करावी. ही यादी निवड प्रक्रियेपासून १ वर्षाकरीता कार्यरत राहील. त्यानंतर स्वतंत्र निवड प्रक्रिया करावी लागेल.

९. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यामध्ये संदर्भ क्रमांक : २ चा शासन परिपत्रक, दिनांक ८ डिसेंबर, २०१० अन्वये पंचायत राज संस्थांना तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी ग्राम पंचायतस्तरावर ऑऊट सोर्सींग पध्दतीने नेमण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंत्यांचा आढावा घ्यावा. उपरोक्त निर्णयानुसार ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या १०,००० पेक्षा जास्त आहे अशा ग्रामपंचायतींना किंवा पंचायत समिती गणामधील ग्रामपंचायतींसाठी स्वतंत्र कनिष्ठ अभियंता नेमला असल्यास अशा कनिष्ठ अभियंत्यांच्या सेवा ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींकरिता वापरण्यात याव्यात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल आढावा घेवून कार्यवाही करावी.

१०. पंचायत अभियंत्याची ग्रामपंचायत निहाय नेमणूक करावी. तथापि ज्या ग्रामपंचायतीला पंचायत अभियंत्याची नेमणुक झाली असेल त्याच ग्रामपंचायतीमध्ये संबंधितांनी कायमस्वरुपी काम करणे अपेक्षित आहे. काही अपवादात्मक परिस्थितीत स्थानिक पातळीवर पंचायत अभियंत्याची तक्रार प्राप्त झाल्यांनतर त्यांची स्वत: किंवा गट विकास अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करावी. या चौकशीच्या वेळेस संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी. चौकशीत सदर अभियंता निर्दोष आढळल्यास आवश्यकता असल्यास उप मुख्यकार्यकारी अधिकारी(पंचायत) हे संबधित पंचायत अभियंत्यांचे स्थलांतर इतर ग्रामपंचायतीमध्ये करु शकतील. तथापि, चौकशीत पंचायत अभियंत्याच्या बाबतीत तक्रारीत तथ्य आढळून आल्यास संबंधितांच्या सेवा संपुष्टात आणण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी

यांना शिफारस केल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी हे संबंधितांना कामावरुन कमी करुन प्रतिक्षा यादीतील नवीन पंचायत अभियंत्यांची नेमणूक करतील. त्याचप्रमाणे गट अभियंताच्या बाबतीत देखील कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी.

११. बांधकाम परवानगीसाठी नियमावलीचा अभ्यास करण्यासाठी प्रशिक्षण घेणे गट/पंचायत अभियंत्यांना बंधनकारक राहील. प्रस्तावित प्रशिक्षण नेमणूक झाल्यानंतर एक महिन्याच्या आत आयोजित करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असेल. जिल्ह्यातील नगर विकास विभागांतर्गत टाऊन प्लानिंगच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन सविस्तर प्रशिक्षण आयोजित करावे. तसेच संबंधित ग्राम पंचायतींनी पंचायत /गट अभियंत्याच्या तांत्रिक सल्ल्याशिवाय/ अभिप्रायाशिवाय बांधकाम परवानगी देऊ नये, असे सर्व ग्रामपंचायतींना तसेच गट विकास अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश द्यावेत.

१२. गट /पंचायत अभियंता यांनी ग्रामपंचायती अंतर्गत कामांचे केलेल्या मूल्यांकनापैकी १०% मुल्यांकन पंचायत समितीच्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांनी तपासावे. अशा चाचणी मूल्यमापनामध्ये तफावत आढळल्यास संबंधित गट / पंचायत अभियंताही व्यक्तीश: जबाबदार राहतील. शासकीय निधीचा/ ग्राम निधीच्या कामावर झालेला खर्च आणि कामाचे प्रत्यक्ष मुल्यमापन याचा ताळमेळ बसला नाही तर गटविकास अधिकारी सक्षम अधिकाऱ्याकडे प्रश्नाधिन कामाचे मुल्यांकन करुन घेईल. प्रचलित नियमाप्रमाणे अशी रक्कम संबंधित अभियंत्याकडून महसूली येणे गृहीत धरून वसूल केली जाईल. याबाबतचा स्पष्ट उल्लेख कराररनाम्यात नमूद करण्यात यावा.

१३. गट / पंचायत अभियंता यांची कंत्राटी नियुक्ती सदर अभियानांतर्गत अभियान कालावधीपुरती मर्यादित असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची ठराविक कालावधीसाठी ११ महिन्याच्या करार तत्वावर करावी. त्याच्या कामाचा आढावा घेवून गुणवत्तेप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे संबंधित अभियंत्यास पुढील ११ महिन्यासाठी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊनच नियुक्ती देण्यात यावी. तथापि, कामाच्या आवश्यकतेनुसार किंवा तक्रारी आढळून

आल्यास ही कंत्राटी नियुक्ती कधीही संपुष्टात आणता येऊ शकेल याबाबतचा स्पष्ट उल्लेख करारनाम्यात करण्यात यावा.

१४. वरीलप्रमाणे नियम व अटींसह पंचायत अभियंत्याकडून रु.१००/- च्या बॉन्ड पेपरवर त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि अनुषंगिक नियम व अटी नमूद करुन करारनामा करुन घ्यावा. वरील संबंधित अभियंता यांची सेवा निव्वळ तात्पुरती, कंत्राटी तत्वावर नेमणूक असल्याने त्यांना शासकीय सेवेत कायम करण्यात येणार नाही किंवा तसा त्यांना शासनाच्या सेवेत कायम करावे असे म्हणण्याचा हक्क असणार नाही. याबाबत ए.उमरानी विरुध्द रजिस्ट्रार,को-ऑ.सोसायटीज्,तामीळनाडू व इतर या सिव्हील अपिल क्र.१४१३/२००३ आणि ३७७४-७६, ४४४६, ६४१५-१६, ७२८२, ९८५४, ९९३३, १०२४४-४५/२००३, ४४९५/२००४ आणि ४४७/२००४ या प्रकरणी दिनांक २८ जुलै,२००४ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कंत्राटी आणि तात्पुरत्या नेमणूक केलेल्या मनुष्यबळास कायमस्वरुपी शासकीय सेवेत सामावून घेता येत नाही, असे सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२, दिनांक २५ ऑगस्ट, २००५ च्या तरतूदीनुसार संबंधितांच्या करारनाम्यात नमूद करुनच नियुक्तीपत्र देण्यात यावे.

१५. पंचायत / गट अभियंता यांना कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असतील. पंचायत / गट अभियंता यांची कंत्राटी पदे जिल्हास्तरावरील पदे असल्याचे गृहीत धरून प्रचलित आरक्षणाचे नियम त्या-त्या प्रवर्गास आरक्षित करून भरण्यात यावीत. महाराष्ट्र लोकसेवा (अजा, अज, निरधिसूचित जमाति (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्यासाठी) आरक्षण अधिनियम, २००१ हा महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी, २००४ मध्ये अंमलात आणला असल्याने या अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीकरीता आरक्षण लागू करावे तसेच भरती प्रक्रियेत महिलांना समांतर ३०% आरक्षण असावे.

१६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी आपल्या स्तरावर प्रचलित नियमाप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात देवून प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे पात्र उमेदवाराची तातडीने नेमणूक करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८०६०९५९५५५९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(डॉ. नरेश गिते)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा.मंत्री, मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,
६. मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व),
७. मा.विधान सभा/ मा.विधान परिषद सदस्य (सर्व),
८. मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन, वित्त, ग्राम विकास, जलसंधारण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, माहिती व तंत्रज्ञान) यांचे स्वीय सहायक,
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०.महा संचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), बाणेर रोड, पुणे,
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
१२.वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-१७) मंत्रालय, मुंबई-३२,
१३.नियोजन विभाग (का.क्र.१४४४), मंत्रालय, मुंबई-३२,

१४.सह सचिव (वित्त/ग्रा.वि.) मंत्रालय, मुंबई-३२,
१५.उप सचिव (वित्त-१/ग्रा.वि.) मंत्रालय, मुंबई-३२,
१६.सह सचिव/उप सचिव सर्व, ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई,
१७.कार्यासन-वित्त-१,
१८.निवडनस्ती-योजना-४

परिशिष्ट - १

शासन निर्णय क्रमांक:- रागांप-२०१४/प्र.क्र.१४८/योजना-४, दिनांक १ ऑगस्ट २०१४ अन्वये ५००० लोकसंख्येपेक्षा जास्त असलेल्या ग्रामपंचायतीची जिल्हानिहाय संभाव्य संख्येनिहाय यादी.

| **सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हानिहाय ग्राम पंचायतींची संख्या** (५००० लोकसंख्येपेक्षा जास्त असलेल्या ग्रामपंचायती) | | |
|---|---|---|
| **जिल्हानिहाय गोषवारा** | | |
| अ.क्र. | जिल्हा | ग्रामपंचायतीची संख्या. |
| १ | पुणे | १८० |
| २ | अहमदनगर | १५१ |
| ३ | ठाणे | १२८ |
| ४ | कोल्हापूर | १२७ |
| ५ | सोलापूर | १२० |
| ६ | नाशिक | ११९ |
| ७ | सांगली | ११४ |
| ८ | जळगांव | १०८ |
| ९ | सातारा | ७५ |
| १० | रायगड | ७३ |
| ११ | औरंगाबाद | ७० |
| १२ | नंदूरबार | ६५ |
| १३ | नागपूर | ६१ |
| १४ | बुलढाणा | ५७ |
| १५ | धुळे | ५६ |
| १६ | लातूर | ५५ |
| १७ | नांदेड | ५१ |
| १८ | अमरावती | ४८ |
| १९ | उस्मानाबाद | ४५ |
| २० | यवतमाळ | ४५ |
| २१ | बीड | ४३ |

| सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हानिहाय ग्राम पंचायतींची संख्या (५००० लोकसंख्येपेक्षा जास्त असलेल्या ग्रामपंचायती) | | |
|---|---|---|
| **जिल्हानिहाय गोषवारा** | | |
| अ.क्र. | जिल्हा | ग्रामपंचायतीची संख्या. |
| २२ | अकोला | ३७ |
| २३ | चंद्रपूर | ३५ |
| २४ | जालना | ३१ |
| २५ | वर्धा | २६ |
| २६ | गोदींया | २३ |
| २७ | परभणी | २३ |
| २८ | भंडारा | २१ |
| २९ | रत्नागिरी | २१ |
| ३० | गडचिरोली | २० |
| ३१ | सिंधुदुर्ग | १९ |
| ३२ | हिंगोली | १५ |
| ३३ | वाशिम | १३ |
| **५००० पेक्षा जास्त असलेल्या ग्रा.पं.ची एकूण लोकसंख्या** | | **२०७५** |

<u>राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान</u>
**मनुष्य बळ निमिर्तीसाठी सुधारित**
**शैक्षणिक अर्हता व अनुभव मर्यादा**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रागांपं-२०१३/प्र.क्र. १४०/योजना-४**
**बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट**
**मुंबई- ४०० ००१**
**तारीख: ०६ ऑगस्ट,२०१४.**

<u>वाचा -</u>

1) **शासन निर्णय क्रमांकः शासन निर्णय क्रमांक रागांपं-२०१२/प्र.क्र.९२/योजना-४ दिनांक ०३/०३/२०१४**
2) **शासन निर्णय क्रमांकः शासन निर्णय क्रमांक रागांपं-२०१४/प्र.क्र.१४८/योजना-४ दिनांक १ ऑगस्ट २०१४.**

<u>प्रस्तावना -</u>

राजीव गांधी सशक्तीकरण अभियानाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय दि.३ मार्च,२०१४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला असून त्यामध्ये पंचायतीचे बळकटीकरण करण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेतील अधिकारी/ कर्मचारी आणि पदाधिकारी /सदस्यांचे सक्षमीकरण करुन पंचायत राज संस्थांचे सबलीकरण करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. पंचायत राज संस्थांच्या प्रशासकीय यंत्रणेस आणि लोक प्रतिनिधीना अधिक सक्षम करण्याच्याद्दष्टीने प्रशासकीय मनुष्यबळाचे पाठबळ उपलब्ध करुन देण्याचे प्रावधानसुध्दा या अभियानात करण्यात आले आहे. शासन निर्णय दिनांक ०३/०३/२०१४ अन्वये राज्य स्तरापासून जिल्हा/ गट /ग्रामपंचायत स्तरापर्यंत विविध क्षमतेची मनुष्यबळ निमिर्ती करणेसाठी मान्यता देण्यात आलेली होती. या अभियानांतर्गत विविध पातळीवर मनुष्यबळाची नियुक्ती करणेसंदर्भात सदरील शासन निर्णयामध्ये परिशिष्ट -४ (४.१ ते ४.५) मध्ये विविध पदांच्या नियुक्तीचा प्रकार, पदसंख्या मासिक वेतन / मानधन आणि सबंधित पदाकरिता लागणारी शैक्षणिक अर्हता व अनुभव नमूद करण्यात आला आहे. या विषयावर मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या बैठकीत या विषयाच्या अनुषंगाने चर्चा करणेत

आली आणि काही पदांच्या नियुक्तीच्या प्रकारामध्ये, पदसंख्यामध्ये आणि संबंधित पदांकरिता लागणा-या शैक्षणिक अर्हता व अनुभवामध्ये बदल करणेसाठी विनंती करणेत आली त्या अनुषंगाने अशा प्रकारचे बदल करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय-**

१. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षम होण्यासाठी पंचायत राज संस्थांच्या प्रशासकीय यंत्रणेस आणि लोक प्रतिनिधीना त्यांना प्रशिक्षित करुन त्यांचे सक्षमीकरण करणेसाठी प्रशासकीय मनुष्यबळ निर्माण करण्यास केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. या अनुषंगाने राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाच्या एकूण प्रकल्प खर्चाच्या ५% निधी प्रशासकीय बाबीवर खर्च करावा असे निर्देश आहेत.

शासन निर्णय दिनांक.०३/०३/२०१४ मधील तरतूदीनुसार -

१) **परिच्छेद ६.२** अन्वये **राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षाअंतर्गत** राज्य व विभाग स्तरावरील २४ पदे **(परिशिष्ट ४.१ प्रमाणे)** निर्माण करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

२) **परिच्छेद ६.३** अन्वये जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षअंतर्गत ३३ जिल्हयात २६४ पदे **(परिशिष्ट ४.२ प्रमाणे)** निर्माण करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

३) **परिच्छेद ३.२** अन्वये **जिल्हा पंचायत संसाधन केंद्रा** अंतर्गत २५ जिल्हयांकरिता प्रत्येकी ५ प्रमाणे १२५ पदे **( परिशिष्ट ४.३ प्रमाणे )** निर्माण करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

४) **परिच्छेद १** अन्वये **पंचायत स्तरावर मनुष्य बळ** (पदांचा तपशिल परिशिष्ट ४.४ प्रमाणे) निमिर्ती साठी मान्यता देण्यात आलेली आहे.

५) **परिशिष्ट ४.५** मध्ये पेसा कार्यक्रमांतर्गत पदांचा तपशील दिला आहे.

२. वरील सर्व संबंधित पदांच्या तपशीलाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ३-३-२०१४ च्या सोबत असलेले सर्व परिशिष्ट ४.१ ते ४.५ व त्यामधील पदांच्या संदर्भातील नियुक्तीचा तपशील या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहेत. वरील सर्व पदांच्या नियुक्तीचा प्रकार, पदसंख्या मासिक वेतन / मानधन आणि सबंधित पदांकरिता लागणारी शैक्षणिक अर्हता व अनुभवामध्ये अंशत: सुधारणा करुन या शासन निर्णयासोबत जोडलेल्या सुधारित परिशिष्ट क्र. ४.१ ते ४.५ प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या सुधारणा विचारात घेऊन या अभियानाचे राज्य प्रकल्प संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी पद भरतीची आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानअंतर्गत पेसा क्षेत्रातील १२ जिल्हयातील ५९ तालुक्यामध्ये प्रत्येक जिल्हयाकरिता एक जिल्हा पेसा समन्वयक अशी १२ पदे आणि प्रत्येक तालुक्याकरिता एक तालुका पेसा समन्वयक याप्रमाणे ५९ पदांना या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

४. वरील पदांसाठी पदभरती प्रक्रियेदरम्यान उमेदवार मिळत नसतील किंवा एखाद्या तांत्रिक अडचणीमुळे योग्य उमेदवारास पदस्थापना देताना अडचण निर्माण झाल्यास अशा परिस्थितीत शैक्षणिक अर्हता व अनुभवामध्ये बदल करावयाचे अधिकार प्रधान सचिव, ग्राम विकास यांना असतील.

५. सेवानिवृत्त किंवा इतर अनुभवी उमेदवाराची कंत्राटी तत्वावर नेमणूक करावयाची असल्यास अशा उमदेवराची वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत असेल व ५८ वर्षावरील वय असलेल्या संबंधित उमेदवाराने काम करण्यास सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. सेवानिवृत्त अधिका-याचे वेतन/मानधन निश्चित करताना सामान्य प्रशासन विभागाच्या प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे वेतन/मानधन निश्चित करावे. प्रतिनियुक्तीवरील अधिकारी कर्मचारी यांना प्रचलित वेतन श्रेणीप्रमाणे वेतन अदाई करण्यात यावी.

६. वेतनाच्या तपशीलात संबंधित पदाचे मासिक वेतनाची कमाल मर्यादा दर्शविली आहे, त्यामुळे निवड केलेल्या उमेदवाराच्या गुणवत्ता व पात्रतेप्रमाणे वेतनाच्या कमाल मर्यादेपर्यंत वेतन/मानधनाची अदाई करण्यात यावी. संबंधित उमेदवाराची कार्यक्षमता आणि अभियानाच्या कामात फलनिष्पती समाधानकारक असणा-या सबंधित कंत्राटी उमेदवारास कमाल मर्यादेपर्यंतचे वेतन देण्याचे अधिकार राज्य प्रकल्प संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना असतील.

वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने सबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अभियानाचे राज्य प्रकल्प संचालक यांनी वरील मंजूर पदांप्रमाणे राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष,जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन

कक्ष, जिल्हा पंचायत संसाधन केंद्र आणि पेसा कार्यक्रमांतर्गत अंतर्गत सुधारित परिशिष्ट क्रमांक ४(४.१ ते ४.५) प्रमाणे पदांची भरती तातडीने करुन अभियानाची अंमलबजावणी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८०६१०००२६७६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(डॉ.नरेश गिते)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा.मंत्री, मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,
६. मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व),
७. मा.विधान सभा/ मा.विधान परिषद सदस्य (सर्व),
८. मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन, वित्त, ग्राम विकास, जलसंधारण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, माहिती व तंत्रज्ञान) यांचे स्वीय सहायक,
९. विभागीय आयुक्त (सर्व), उप आयुक्त (विकास,आस्थापना) सर्व
१०.महा संचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), बाणेर रोड, पुणे,
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
१२.वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-१७) मंत्रालय, मुंबई-३२,
१३.नियोजन विभाग (का.क्र.१४४४), मंत्रालय, मुंबई-३२,
१४.सह सचिव/ उप सचिव (वित्त/ग्रा.वि.वि.) मंत्रालय, मुंबई-३२,

१५.सह सचिव/उप सचिव सर्व, ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई,
१६.कार्यासन-वित्त-१
१८.निवडनस्ती-योजना-४

## सुधारित परिशिष्ट क्र.- ४

(ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक.रागांपं-२०१३/प्र.क्र. १४०/योजना-४ सोबतचे सहपत्र )

## सुधारित परिशिष्ट क्र. ४.१

## राज्य व विभागीय स्तरावरील पदे

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्तीचा प्रकार | पद संख्या | मासिक वेतन (रुपये) दरमहा | अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १. | राज्य प्रकल्प संचालक | प्रतिनियुक्ती | १ | | जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद या दर्जाचे |
| २. | उप प्रकल्प संचालक | प्रतिनियुक्ती | १ | रु.१५६००-३९१०० | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद या दर्जाचे |
| ३. | लेखा अधिकारी | प्रतिनियुक्ती | १ | रु.१५६००-३९१०० (४४००) | महाराष्ट्र लेखा व वित्त संवर्गातील अधिकारी प्रतिनियुक्तीने |
| अ) | प्रलेखन संशोधन व मूल्यमापन तज्ञ | कंत्राटी | १ | रु.६०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१) पदव्युत्तर पदवी (राज्यशास्त्र/ लोकप्रशासन/ समाजकार्य/ समाजशास्त्र / ग्रामीण व्यवस्थापन)<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A (मनुष्य संसाधन )<br>२) संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभव:**<br>१.प्रकल्प व्यवस्थापन किंवा समन्वयाचा किमान ५ वर्षाचा अनुभव त्यापैकी<br>१. प्रकल्प मूल्यमापन व प्रकल्पाचा परिणाम व फलनिष्पत्तीचे संशोधन व प्रलेखन संदर्भाने किमान ३ वर्षाचा अनुभव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | २. MIS रचना, निर्मीती व वापराबाबत ३ वर्षाचा अनुभव |
| ब) | विकेंद्रीकरण तज्ञ | कंत्राटी | १ | रु.६०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. पदव्युत्तर पदवी (समाजकार्य/ ग्रामीण व्यवस्थापन /समाजशास्त्र /लोकप्रशासन )<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त M.B.A. (मनुष्य संसाधन)<br>अथवा<br>२. सेवानिवृत म.वि.से. गट-अ मधील उमेदवारासाठी पदव्युत्तर पदवीची अट शिथिल करुन अर्हता पदवी (कोणताही विषय)<br>३. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभव:**<br>अ) पंचायत राज संबंधित कायदे, प्रशिक्षण व त्यांची अंमलबजावणी याबाबत किमान ५ वर्षाचा अनुभव.<br>ब) सेवानिवृत म.वि.से. गट-अ साठी किमान १५ वर्षाचा अनुभव. |
| क) | पंचायतींचे आर्थिक बळकटीकरण तज्ञ | कंत्राटी / प्रतीनीयुक्ती | १ | रु.६०,०००/- पर्यन्त दरमहा कंत्राटीसाठी किंवा म.वि.से म.ले.व वि.से. मधील गट-अ /गट -ब यांचे प्रचलित वेतन | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी/ शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A. ( वित्त व्यवस्थापन/मनुष्य संसाधन/अर्थशास्त्र /वाणिज्य/ लोकप्रशासन ) अथवा<br>म.वि.से /म.ले.व वि.से. गट-अ /गट ब प्रतिनियुक्तीने<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | **अनुभव:**<br>शासकीय / निमशासकीय/ पंचायत राज संस्थाची वित्तिय व्यवस्थापन/ प्रणाली संदर्भात किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| ड) | प्रशिक्षण व क्षमताबांधणी तज्ञ | कंत्राटी | १ | रु.६०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (समाजकार्य/ समाजशास्त्र, ग्रामीण व्यवस्थापन / लोकप्रशासन )<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A.(मानव संसाधन)<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभव:**<br>१. प्रकल्प व्यवस्थापन समन्वयाचा किमान ५ वर्षे अनुभव.<br>२. प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रम राबविणे वा त्याचे समन्वयन याबाबत किमान ३ वर्षाचा अनुभव . |
| इ) | माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ | कंत्राटी | १ | रु.६०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (मास कम्युकेशन/ मिडिया/ राज्यशास्त्र/ लोक प्रशासन / समाजकार्य/ समाजशास्त्र )<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A. (मानवसंसाधन)<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभव:** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | माहिती, शिक्षण व संवाद संबधातील किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| ४. | कार्यालयीन सचिव | कंत्राटी/ प्रतीनियुक्ती | १ | रु.२५,०००/- पर्यन्त दरमहा कंत्राटीसाठी व प्रतीनियुक्ती वरील कर्मचा-यास नियमित वेतन व भत्ते दिले जातील | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. शासन मान्यता प्राप्त संस्थेचा कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक (MS-Office)<br>३. मराठी-३० व इंग्रजी-४० श.प्र.मि. परिक्षा पास असणे आवश्यक.<br>अथवा<br>कक्ष अधिकारी किंवा अधीक्षक दर्जाचा अधिकारी प्रतिनियुक्तीने, ज्याला संगणकाचे ज्ञान (MS-Office) व मराठी-३० व इंग्रजी-४० टंकलेखन करता येणे आवश्यक असावे. |
| | | | | | **अनुभव:**<br>किमान ३ वर्षाचा कार्यालय व्यवस्थापनाचा अनुभव असणा-यास प्राध्यान्य |
| ५. | लेखापाल | कंत्राटी | १ | रु.२५,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. शासन मान्यताप्राप्त संस्थेचा वाणिज्य क्षेत्रातील पदवीधर/ पदव्युत्तर<br>२.टॅली परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र<br>३. संगणकाचे ज्ञान आवश्यक (MS-Office) |
| | | | | | **अनुभव:**<br>लेखापाल / लेखाविषयक कार्यालयीन कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| ६. | कार्यालयीन सहायक | कंत्राटी | १ | रु.२०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. कोणत्याही विषयाचा पदवीधर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | २. मराठी-३० व इंग्रजी-४० श.प्र.मि. परिक्षा पास असणे आवश्यक.<br>३. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभव:**<br>कार्यालयीन कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-यास प्राध्यान्य. |
| ७. | परिचर | कंत्राटी | १ | रु.१०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>दहावी (S.S.C.)उत्तीर्ण |
| | | | | | **अनुभव:**<br>२-३ वर्षाचा अनुभव असणा-यास प्राध्यान्य |
| ८. | विभागीय प्रकल्प उप संचालक (प्रत्येक विभागा-साठी) | कंत्राटी | ६ | प्रत्येकी रुपये ५०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (समाजकार्य/ ग्रामीण व्यवस्थापन/ लोकप्रशासन)<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A. (मानव संसाधन)<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office |
| | | | | | **अनुभव:**<br>प्रकल्प व्यवस्थापनाचा/ समन्वयाचा किमान ५ वर्षाचा अनुभवापैकी प्रकल्प मूल्यमापन व MIS वापराचा किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| ९. | कार्यक्रम समन्वयक (प्रत्येक विभागा-साठी) | कंत्राटी | ६ | प्रत्येकी रुपये ३०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१.खालील विषयातील पदव्युत्तर (समाजकार्य/समाजशास्त्र/ ग्रामीण व्यवस्थापन/लोकप्रशासन) किंवा शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A.(मानव संसाधन) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | २. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभव:**<br>प्रकल्प व्यवस्थापन /प्रशिक्षण कार्यक्रम समन्वयाचा किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| **राज्य व विभागीय स्तरावरील एकूण पदे** | | | २४ | | |

## सुधारीत परिशिष्ट क्र. ४.२
## प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील जिल्हा स्तरावरील पदे (३३ जिल्ह्यांकरिता)

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्ती-चा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (३३ जिल्ह्यां-साठी) | कंत्राटी | ३३ | प्रत्येकी रु.४५,०००/पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (समाजकार्य/ समाजशास्त्र/ लोकप्रशासन / राज्यशास्त्र)<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A.(मानव संसाधन)<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office )<br>**अनुभव:**<br>१.प्रकल्प व्यवस्थापनाचा किंवा समन्वयाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>२. प्रकल्प सनियंत्रण MIS वापर याचा किमान २ वर्षाचा अनुभव. |
| २. | क्षमता बांधणी तज्ञ | कंत्राटी | ३३ | प्रत्येकी रु. ३०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (समाजकार्य/समाजशास्त्र/ लोकप्रशासन/ग्रामिण व्यवस्थापन)<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A.(मानव संसाधन)<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्ती-चा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | **अनुभवः**<br>अ) प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी कार्यक्रम अंमलबजावणी, सनियंत्रण व प्रशिक्षण संदर्भात किमान ३ वर्षाचा अनुभव<br>ब) पंचायती राज कायद्यासंबधी कुशल प्रशिक्षक म्हणून अनुभव आवश्यक. |
| ३. | पंचायत प्रक्रिया व स्थानिक स्वराज्य संस्था तज्ञ | कंत्राटी पद्धतीने/ प्रतीनियुक्तीने | ३३ | प्रत्येकी रु. ३०,०००/- पर्यन्त दरमहा किंवा प्रतिनियुक्तीच्या कर्मचा-याच्या वेतनाप्रमाणे. | **शैक्षणिक अर्हताः**<br>१. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (समाजकार्य/समाजशास्त्र/ लोकप्रशासन/ग्रामिण व्यवस्थापन)<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A.(मानव संसाधन) किंवा सेवा निवृत्त मविसे अधिकारी (कोणत्याही विषयाचा पदवीधारक)<br>अथवा<br>प्रतिनियुक्तीने विस्तार अधिकारी (पंचायत)<br>अथवा<br>सहाय्यक गट विकास अधिकारी (क्षमता असलेले)<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्ती-चा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | **अनुभवः**<br>पंचायत प्रक्रिया व स्थानिक स्वराज्य संस्था/ पंचायत राज संस्थेत कायद्याच्या अंमल-बजावणीचा व प्रशिक्षणाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.<br>प्रतिनियुक्तीच्या संदर्भात संबंधित अधिका-यांना पंचायत प्रक्रिया/ पंचायत राज संस्थेच्या प्रशिक्षणाचा अनुभव असावा.<br>सेवानिवृत्त म.वि.से. अधिकारी यांची किमान १५ वर्षाची सेवा झालेली असावी. |
| ४. | सुप्रशासन तज्ञ | कंत्राटी पद्धतीने | ३३ | प्रत्येकी रु. ३०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:**<br>१. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी(समाजकार्य/समाजशास्त्र/ राज्यशास्त्र/लोकप्रशासन/ग्रामिण व्यवस्थापन )<br>अथवा<br>शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A.(मानव संसाधन)<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभवः-**<br>प्रकल्प संनियंत्रण व MIS च्या अंमलबजावणीचा किमान ३ वर्षाचा अनुभव |

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्ती-चा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| ५. | लिपीक | कंत्राटी पद्धतीने | ३३ | प्रत्येकी रु. १५,०००/- पर्यन्त दरमहा. | **शैक्षणिक अर्हता:** १.शासन मान्यता प्राप्त संस्थेचा कोणत्याही शाखेचा पदवीधर २. मराठी-३० व इंग्रजी-४० श.प्र.मि. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| | | | | | **अनुभवः-** कार्यालयीन कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या उमेदवारास प्राधान्य. |
| ६. | लेखापाल | कंत्राटी पद्धतीने | ३३ | प्रत्येकी रु. २०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:** शासन मान्यता प्राप्त संस्थेचा वाणिज्य क्षेत्रातील पदवीधर/ पदव्युत्तर २. टॅली प्रोग्रॅम हाताळण्यात प्राविण्य आवश्यक. ३. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभवः-** कार्यालयीन कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या उमेदवारास प्राधान्य. |
| ७. | कार्यालयीन सहायक | कंत्राटी पद्धतीने | ३३ | प्रत्येकी रु. १२,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:** १.पदवीधर २. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) ३. मराठी-३० व इंग्रजी-४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण |

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्ती-चा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | **अनुभवः-**<br>कार्यालयीन कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या उमेदवारास प्रधान्य. |
| ८. | परिचर | कंत्राटी पद्धतीने | ३३ | प्रत्येकी रु. ८,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता: -**<br>दहावी (S.S.C.) उत्तीर्ण. |
| | | | | | **अनुभवः-**<br>कार्यालयीन कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या उमेदवारास प्रधान्य |
| | **एकूण** | | **२६४** | | |

## सुधारीत परिशिष्ट क्र. ४.३.
## जिल्हा पंचायत संसाधन केंद्रासाठी निर्माण करावयाची पदे (नवीन २५ केंद्रे)

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्तीचा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | **अर्हता /अनुभव** |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रशिक्षण व्यवस्थापक प्रत्येकी १ पद | कंत्राटी पद्धतीने | २५ | प्रत्येकी रु. ३०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:** १.खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (समाजकार्य/समाजशास्त्र/ लोकप्रशासन/ग्रामिण व्यवस्थापन ) अथवा शासन मान्यता प्राप्त संस्थेचा M.B.A.(मानव संसाधन) २. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |
| | | | | | **अनुभवः-** अ) प्रशिक्षण कार्यक्रम व्यवस्थापन व समन्वयाचा किमान ३ वर्षाचा अनुभव ब) पंचायत राज कायद्यासंदर्भात कुशल प्रशिक्षक म्हणून अनुभव. |
| २. | सत्र व्यवस्थापक प्रत्येकी ३ पदे | कंत्राटी | ७५ | प्रत्येकी रु. १२,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:-** १. शासन मान्यता प्राप्त संस्थेचा कोणत्याही शाखेचा पदवीधर २. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office ) |

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्तीचा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | **अर्हता /अनुभव** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | **अनुभवः-**<br>प्रशिक्षण कार्यक्रम व्यवस्थापनामध्ये / सत्र व्यवस्थापक म्हणून किमान २ वर्षाचा अनुभव असणा-यास प्राध्यान्य. |
| ३. | डेटा एन्ट्री ऑपरेटर प्रत्येकी १ पद | कंत्राटी | २५ | प्रत्येकी रु. ८,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हताः**<br>१. बारावी (H.S.C.) उत्तीर्ण<br>२. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office)<br>३. मराठी-३० व इंग्रजी-४० श.प्र.मि.परीक्षा उत्तीर्ण |
| **एकूण** | | | **१२५** | | |

## सुधारित परिशिष्ट क्र. ४.४
## ग्राम पंचायत आणि पंचायत समिती स्तरावर निर्माण करावयाची पदे

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्तीचा प्रकार | पद-संख्या | **मासिक वेतन (रुपये)** | **अर्हता/अनुभव** |
|---|---|---|---|---|---|
| १. | पंचायत विकास अधिकारी | कंत्राटी | १२८० | प्रत्येकी रु. १२,०००/- पर्यन्त दरमहा | **दिनांक १ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णय क्रमांक : रागांप- २०१४/ प्र.क्र.१४८/ योजना-४ मधील तरतूदी-प्रमाणे करण्यात आलेले बदल गृहीत धरणेत यावेत. ज्यामध्ये पदसंख्या वेतन व अर्हतेत बदल करण्यात आलेले आहेत.** |
| २. | कनिष्ठ अभियंता (३५१ पंचायतींना) | कंत्राटी | ७०२ | प्रत्येकी रु. १५,०००/- पर्यन्त दरमहा | |
| **एकूण** | | | **१९८२** | | |

## सुधारित परिशिष्ट क्र.४.५.

## पेसा कार्यक्रमांतर्गत निर्माण करावयाची पदे

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्तीचा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | अर्हता/ अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १. | पेसा समन्वयक (जिल्हा स्तरावर) | कंत्राटी | १२ | २५,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:** १.खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (सामाजिक कार्य/ ग्रामीण विकास/ समाजशास्त्र/ लोक प्रशासन/ P.G.D. ग्रामीण विकास/आदिवासी विकास/मानववंश शास्त्र ) . २. संगणकाचे ज्ञान आवश्यक( MS-Office) |
| | | | | | **अनुभवः-** ग्रामीण विकास क्षेत्रातील / आदिवासी विकासाच्या निगडीत क्षेत्रातील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २. | पेसा समन्वयक (तालुका-स्तरावर) | कंत्राटी | ५९ | प्रत्येकी रु. २०,०००/- पर्यन्त दरमहा | **शैक्षणिक अर्हता:** १. खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (सामाजिक कार्य/ मानववंशशास्त्र / ग्रामीण विकास/ समाजशास्त्र/ लोक प्रशासन/ P.G.D. ग्रामीण विकास/आदिवासी विकास) २. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( MS-Office) |
| | | | | | **अनुभवः-** |

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्तीचा प्रकार | पद-संख्या | मासिक वेतन (रुपये) | अर्हता/ अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ग्रामीण विकास क्षेत्रातील/ आदिवासी विकासाच्या निगडीत क्षेत्रातील किमान २ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| **एकूण** | | | ७१ | | |